# अदानी इलेक्ट्रिसिटीकडून लॉकडाऊन काळात विशेष सुविधा

**मुंबई :** केंद्र व राज्य सरकारने कोरोना व्हायरससंदर्भात जारी केलेल्या सूचनेनंतर रविवारच्या लॉकडाऊन काळात अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिडेटने (एईएमएल) आपल्या ग्राहकांना घरामध्येच राहात डिजिटल पेमेंट मोड्स सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. ग्राहकांनी घरामध्येच राहून सोशल डिस्टन्सिंग राखतील, या खात्रीसाठी कंपनीने सोसायटीमध्ये सेल्फ-हेल्प पेमेंट किओस्क, ड्राप बॉक्सेसची सुविधा दिली आहे.

एईएमएलने महाराष्ट्र विद्युत नियामक महामंडळाला वितरण परवाना नियमन २००६, ८.६.८ च्या सामान्य स्थितींतर्गत महामारी आजाराच्या परिणामांचे निर्मूलन करण्यासाठी हाती घेण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत देखील कळवले आहे.एईएमएलला कोरोना व्हायरसमुळे सेवा निलंबित होणे, मूदतीपूर्वीच सेवा खंडित होणे, युटिलिटी कट-ऑफ्स याबाबत चिंता आहे आणि कंपनीकडे पुरवठा सुधार करण्यासंदर्भात आणि सुरक्षा संबंधित तक्रारी केल्या जात आहेत. ग्राहक अदानी इलेक्ट्रिसिटी मोबाइल ॲपच्या माध्यमातून बिलसंदर्भात माहिती प्राप्त करू शकतात आणि १८००५३२९९९८ क्रमांकावर मिस्ड कॉल देत नो सप्लाय तक्रारींची नोंद करू शकतात. तसेच ग्राहक पेटीएम, गुगल पे, ॲमेझॉन पे, फोनपे, बीएचआयएम, मोबिक्विक आणि फ्रीचार्ज अशा ऑनलाइन पेमेंट मोड्सच्या माध्यमातून बिल देयके भरू शकतात. ग्राहक व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी मीटर रिडिंग, बिलिंग, बिल कनेक्शन, नवीन कनेक्शन्स जोडणी अशा मानवी इंटरफेससह इतर सेवा ३१ मार्च २०२० पर्यंत खंडित करण्यात आल्या आहेत. एईएमएल सतत स्थितीचे अवलोकन करत आहे आणि सद्यपरिस्थितीला अनुसरून सेवा पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न करत आहे . एईएमएलचा प्रवक्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार 'एईएएमएल कोविड-१९च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या स्थितीमध्ये ग्राहक व कर्मचाऱ्यांना पाठिंबा देण्याचे कार्य सुरूच ठेवेल. एईएमएल समस्या निराकरणासाठी पुरवठा व डिजिटल सेवा सुरूच ठेवेल आणि सुलभ पेमेंट सुविधा देईल. ज्यामुळे आमचे ग्राहक घरातूनच आरामशीरपणे या सुविधांचा लाभ घेऊ शकतील, असे एईएमएल म्हटले आहे.